# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

**२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.**

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

Website : http//:barti.maharashtra.gov.in


## बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम नोकरीच्या संधी तसेच Aptitude Test आणि Interview वर आधारित खाजगी व कॉर्पोरेट क्षेत्रातील चांगल्या नोकरीच्या संधी याकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांच्या पूर्वतयारी करिता नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांमध्ये ३० प्रशिक्षण केंद्रामार्फत ( प्रति प्रशिक्षण केंद्र १५० प्रशिक्षणार्थी १ बॅच यात्रमाणे ६ महिने कालावधी करीता) प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. इच्छूक व पात्र उमेदवारांनी संबंधित जिल्ह्यातील केंद्राशी संपर्क साधून त्या केंद्राकडे अर्ज करावा.

पात्र युवक-युवतींनी **https://barti.maharashtra.gov.in** या वेब साईटवरून **'Notice Board'** च्या सदराखाली बँक, रेल्वे, एल.आय.सी. लिंकवरून अर्ज डाऊनलोड करून किंवा खालील नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयातून प्राप्त करून, ज्या ठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या केंद्रावर **दि.२० जुलै, २०२२** रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्यामध्ये बदल करण्याचे अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचे सर्व अधिकार महासंचालक, बार्टी पुणे तसेच शासनास राहतील.

जाहिरात/बॅच क्र.०५/आय.बी.पी.एस/२०२२/

**(धम्मज्योती गजभिये)**
**महासंचालक, बार्टी, पुणे.**